**प्रेस नोट** दिनांक १२/०६/२०२५

(१) सतीष राजन्ना दोनकलवार, वय ४० वर्षे, पद सहा.पोलीस निरीक्षक, प्रभारी पोस्टे पालम रा.१. धूउरा, ता. किनवट, जि. नांदेड, २. लहजाई नगरी, बंगला नंबर १२२, नांदेड, ता.जि. नांदेड, ३. हा.मु. खिरडे यांचेकडे किरायाने, पिंपळगाव रोड, पालम जि. परभणी. (२) राजेश राजलिंगम येसूरकर, वय ५२ वर्षे, पद पोह/३८५, पोस्टे पालम, रा. सिध्दार्थनगर, पुर्णा, ता. पुर्णा, जि. परभणी, हा.मु. पोलीस क्वार्टर, पालम, ता. पालम, जि. परभणी. (३) अशोक भास्करराव केदारे, वय ३५ वर्षे, पद पोशि/१५३१, पोस्टे पालम, रा. वैद्यनगर, पालम, ता. पालम, जि. परभणी हे १०,०००/- रूपयांची लाच स्विकारले प्रकरणी अेसीबीच्या जाळयात.

| | |
|---|---|
| युनिट | लाप्रवि युनिट परभणी |
| पो.स्टे.गुरनं व कलम | पोस्टे पालम, जि. परभणी गुरनं. २२०/२०२५ कलम ७, ७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.१२.०६.२०२५ |
| आरोपी यांचे नाव, हुद्दा व पत्ता | (१) सतीष राजन्ना दोनकलवार, वय ४० वर्षे, पद सहा.पोलीस निरीक्षक, प्रभारी पोस्टे पालम रा.१. लहजाई नगरी, बंगला नंबर १२२, नांदेड, ता.जि. नांदेड, २. हा.मु. खिरडे यांचेकडे किरायाने, पिंपळगाव रोड, पालम जि. परभणी.<br>(२) राजेश राजलिंगम येसूरकर, वय ५२ वर्षे, पद पोह/३८५, पोस्टे पालम, रा. सिध्दार्थनगर, पुर्णा, ता. पुर्णा, जि. परभणी, हा.मु. पोलीस क्वार्टर, पालम, ता. पालम, जि. परभणी.<br>(३) अशोक भास्करराव केदारे, वय ३५ वर्षे, पद पोशि/१५३१, पोस्टे पालम, रा. वैद्यनगर, पालम, ता. पालम, जि. परभणी |
| लाच स्विकारली रक्कम | १०,०००/- रूपये |

थोडक्यात माहिती :- यातील नमुद तक्रारदार यांचे शेतात दि. ०६.०२.२०२५ रोजी जुगार खेळतांना पकडून गुरनं २१०/२०२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात तक्रारदार व त्यांचे मित्रास आरोपी केले आहे. तक्रारदार व त्याचे मित्रास एलसीबी परभणी येथे न नेता पालम तहसील येथे जामीनासाठी नेण्याकरीता पोह येसुरकर यांनी प्रत्येकी पाच हजार रूपये प्रमाणे १०,०००/- रुपये लाचमागणी करत असल्याची तक्रार प्राप्त झाली.

दि. १०.०६.२०२५ रोजी पडताळणी दरम्यान पोह येसुरकर हे पो स्टेशन ला हजर नव्हते. त्यामुळे तक्रारदार यांनी पोह येसुरकर यांचा मदतनीस पोशि केदारे यांची भेट घेतली. तक्रारदार व पोशि केदारे यांचे भेटीदरम्यान पोशि केदारे यांनी तक्रारदार यांना त्याचे व त्यांचे मित्राचे प्रत्येकी ५ प्रमाणे लाचेची मागणी केली. त्यानंतर पोशि केदारे यांनी तक्रारदार यांना सपोनी दोनकलवार यांचे कॅबीन मध्ये घेऊन गेले. त्यावेळी पोशि केदारे यांनी प्रत्येकी ५ सांगितले असल्याचे सपोनी दोनकलवार यांना सांगितले. त्यावेळी सपोनी दोनकलवार यांनी तक्रारदार यांना जो बोला है वो करे दे असे म्हणून प्रोत्साहन दिले. त्यावरुन तक्रारदार यांचेकडे प्रत्येकी ५०००/- रुपये प्रमाणे दोघांचे एकूण १०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

दि. १२.०६.२०२५ रोजी सापळा कारवाई करीता तक्रारदार व त्यांचा मित्र यांना पाठविण्यात आले. त्यावेळी लोकसवेक पोह राजेश राजलिंगम येसूरकर यांनी १०,०००/-रुपये तक्रारदार यांचा मित्र/साक्षीदार यांचे समक्ष स्विकारले आहे. लोकसेवक येसूरकर यांना लाचेच्या रक्कमेसह व लोकसेवक सपोनि दोनकलवार व पोशि केदारे यांना ताब्यात घेण्यात आले आहे

| | |
|---|---|
| सापळा पथक | श्री महेश पाटणकर, पोलीस उप अधीक्षक, श्री अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, सपोउपनि निलपत्रेवार, पोह/आदमे, मपोह/सिमा चाटे, पोशि/अतुल कदम, कल्याण नागरगोजे, शेख जिब्राईल, राम घुले, बोधनकर, चापोशि/नरवाडे व लहाडे, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. |
| सापळा व तपास अधिकारी | श्री अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या इसमाविरुध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| संपर्क पत्ता :- कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, शनिवार बाजार, नानलपेठ, परभणी. | |
| दुरध्वनी क्रमांक :- 02452-220597 टोल फ्री क्रमांक:- 1064 ऑनलाईन ॲप acbmaharastra.net | |
| spacbnanaded@mahapolice.gov.in | dyspacbparbhani@mahapolice.gov.in |
| Facebook : Acb Parbhani | Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani. |
| Instagram : acbparbhani | Twitter : @ACBPARBHANI |
| Youtube Channel @ACBParbhani | Find us on Google Map & Mappels india Map |
| 9272111064 | |


(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,परभणी